मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

follow us : /rajdandlive

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।



**हिरवा निसर्ग हा भवतीने** ..अशा सुंदर मराठी गाण्याच्या ओळी हे दृश्य पाहिल्यावर ओठावर येतात. नुकत्याच पडलेल्या पावसाचे नयनरम्य दृश्य.

RNI Regd. No. 72105/99 | वर्ष २५ | अंक ३१७ | सातारा | शनिवार दि.१७ ऑगस्ट २०२४ | पाने ४ | किंमत ५/- रूपये

## महत्त्वाचे

### ८० लाख बहिणींच्या खात्यात ३ हजार जमा !

**मुंबई :** 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या पहिल्या हप्त्याचा लाभ देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. आतापर्यंत ८० लाखापेक्षा अधिक पात्र महिलांना लाभ देण्यात आला आहे, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी दिली.

तटकरे म्हणाल्या की, दिनांक १४ ऑगस्ट पासून लाभ देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. आतापर्यंत राज्यात ८० लाख महिलांच्या बँक खात्यात २ महिन्यांच्या लाभाची रक्कम ३ हजार रुपये जमा करण्यात आली आहे. उर्वरित पात्र महिलांना सुद्धा दि. १७ ऑगस्ट पर्यत हा लाभ मिळणार आहे.

राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी आणि महिलांना स्वावलंबी, आत्मनिर्भर करण्यासाठी महिला व बाल विकास विभागाच्यावतीने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजना जाहीर झाल्यानंतर या योजनेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. दिनांक १४ ऑगस्टपर्यत १ कोटी ६२ लाखापेक्षा अधिक महिलांची नोंदणी झाली आहे.

### भारती विद्यापीठ न्यू लॉ कॉलेजच्या अभ्यासक्रमाची घोषणा

**पुणे :** भारती विद्यापीठ अभिमत विद्यापीठाच्या न्यू लॉ कॉलेजने शैक्षणिक वर्ष २०२४ -२५ साठी बीबीए एलएलबी अभ्यासक्रमाची घोषणा केली आहे. बीबीए एलएलबी साठी प्रवेश परीक्षा २४ ऑगस्ट रोजी आहे,त्यासाठी २२ ऑगस्ट ही नाव नोंदणीची अंतिम मुदत आहे. अधिक माहिती ८०१०९७७०१० या दूरध्वनी क्रमांकावर तसेच nlcpunebharatividyapeeth.edu या ठिकाणी ईमेल करून मिळू शकेल.हा अभ्यासक्रम ५ वर्षाचा आहे.या अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी एमएचसीईटी परीक्षा देण्याची आवश्यकता नाही. भारती विद्यापीठ अभिमत विद्यापीठ विधी शाखेच्या अधिष्ठाता आणि न्यू लॉ कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ उज्वला बेंडाळे यांनी ही माहिती पत्रकाद्वारे दिली.

# दोन वर्षात राज्यात शिंदेंचे इंजिन दुप्पट वेगाने

## ठाकरेंपेक्षा दुप्पट फाईल्सचा निपटारा तर तिप्पट कामांना मंजुरी

**मुंबई:** महायुती सरकारच्या २५ महिन्यांच्या कार्यकाळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तब्बल २२ हजार ३६४ फाईल्सचा निपटारा केल्याची माहिती मुख्यमंत्री कार्यालयातून देण्यात आलीय. महाविकास आघाडी सरकारच्या अडीच वर्षांच्या तुलनेत मुख्यमंर्त्यांनी दुप्पट फाईल्सचा निपटारा तर तिप्पट कामांना मंजुरी दिलीय. यावरुन मुख्यमंर्त्यावर महायुतीतून शुभेच्छांचा वर्षाव होतोय. तर दुसरीकडं मात्र विरोधक यावरुन टीका करत असल्याचं बघायला मिळतय.

मुख्यमंर्त्याची सर्वोत्तम कामगिरी : मुख्यमंत्री कार्यालयातून जाहीर करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार १ जुलै २०२२ ते ३१ जुलै २०२४ या कार्यकाळात मुख्यमंत्री कार्यालयाकडं एकूण २३ हजार ६७४ फाईल्स प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी २२ हजार ३६४



फाईल्सचा निपटारा केला गेलाय. राज्यातील विकासकामांचे प्रस्ताव आणि जनहिताच्या फाईल्सचा वेगाने पाठपुरवठा करून मुख्यमंत्री कार्यालयानं मंजूर केल्या आहेत. राज्यातील मुख्यमंत्री कार्यालयाची ही आजपर्यंतची सर्वोत्तम विक्रमी कामगिरी असल्याचं बोललं जातय. तर १ जानेवारी २०२० ते २० मे २०२२ या महाविकास आघाडी सरकारच्या काळात माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्री कार्यालयात एकूण ११ हजार २२७ फाईल्स प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी केवळ ६ हजार ८२४ फाईल्स मंजूर करण्यात आल्या.

फेसबुक नाही तर फेस टू फेस काम करणारे मुख्यमंत्री : महाविकास आघाडीचं सरकार असताना तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे फेसबुक लाईव्हवरुनच सरकार चालवत होते, असा आरोप महायुतीतील नेत्यांकडून वारंवार केला जात होता, आताही तसा आरोप होत असतो. त्यानंतर आता मुख्यमंत्री कार्यालयातून आकडेवारी समोर आल्यानंतर उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात राज्यातील विकास खुंटला, राज्य डबघाईला गेलं, अशी टीका केली जात आहे.

# मराठीसाठी 'वाळवी' या चित्रपटाला सर्वोत्तम चित्रपट पुरस्कार जाहीर

**नवी दिल्ली :** ' वाळवी ' या चित्रपटाला मराठी भाषेतील सर्वोत्तम चित्रपटाचा, 'मर्मर्स ऑफ द जंगल या माहितीपटाला नॉन फिचर फिल्म श्रेणीतील सर्वोत्तम माहितीपटाचा पुरस्कार, आणखी एक मोहेन्जो दडो या माहितीपटाला सर्वोत्तम जीवनचरित्रात्मक ऐतिहासिक पुनर्निर्माण, संकलन चित्रपटाचा, 'वारसा'(लेगसी)' या माहितीपटाला सर्वोत्तम कला-संस्कृती चित्रपटाचा तर सर्वोत्तम निवेदन आणि आवाजासाठी सुमंत शिंदे यांना आज राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाले आहेत.

येथील नॅशनल मिडीया सेंटरमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत वर्ष २०२२ साठीच्या ७० व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. याप्रसंगी ज्यूरीमध्ये फीचर फिल्म ज्यूरीचे अध्यक्ष राहुल रवैल, नॉन-फीचर फिल्म ज्यूरीचे अध्यक्ष निला मधब पांडा, आणि बेस्ट राइटिंग ऑन सिनेमा ज्यूरीचे अध्यक्ष गंगाधर मुढालैर हे उपस्थित होते. फिचर फिल्म श्रेणीत ३८ पुरस्कार जाहीर झाले. यात विविध भाषेतील उत्कृष्ट चित्रपटांचाही समावेश



आहे. तर नॉन फिचर फिल्ममध्ये विविध श्रेणीमध्ये १८ पुरस्कार जाहीर झाले.

'वाळवी' ठरला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट

फिचर फिल्म श्रेणीत वर्ष २०२२ साठी मराठी भाषेमधून 'वाळवी' हा चित्रपट सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट ठरला. वाळवी हा परेश मोकाशी यांनी दिग्दर्शित केला आहे . तर झी स्टुडिओजनं या चित्रपटाची निर्मिती केली आहे. डार्क कॉमेडी प्रकारातला हा रहस्यपट आहे. या चित्रपटात स्वप्नील जोशी, अनिता दाते केळकर, सुबोध भावे आणि शिवानी सुर्वे यांनी मुख्य भूमिका साकारल्या आहेत.

# वक्फ बोर्डाच्या जमिनी लाटण्याचा डाव असेल तर... उद्धव ठाकरे

**मुंबई :** वक्फ कायदा सुधारण्याच्या नावाखाली वक्फ बोर्डाच्या जमिनी हडप करण्याचा केंद्र सरकारचा डाव असेल, किंबहुना कोणत्याही धर्मस्थानांच्या मालमत्ता हडप करण्यासाठी प्रयत्न केले जात असतील तर आम्ही असे वेडेवाकडे काहीही होऊ देणार नाही, असा इशारा शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीच्या मेळाव्यात बोलताना केंद्र सरकारला दिला.

अयोध्येची जमीन कोणत्या ट्रस्टला दिली त्याची चौकशी केली जाणे गरजेचे आहे. केदारनाथ देवस्थानात सोन्याची चोरी झाली. त्याचे पुढे काय झाले? सरकारचे काही चालत नाही म्हणून लोक मला प्रश्न विचारतात. म्हणून माझे सरकारला आव्हान आहे, ही निवडणूक आत्ताच घ्याव्यात.

केंद्र सरकारने केवळ समाजात आगी लावण्यासाठी वक्फ कायदा सुधारणा विधेयकासाठी संयुक्त संसदीय समिती स्थापन करण्याचे नाटक केले आहे, असा आरोप ठाकरे यांनी केला. नोटाबंदीचा निर्णय घेताना तुम्ही आम्हाला विचारले होते का? तुमच्याकडे बहुमत असताना वक्फ कायदा सुधारणा विधेयक थेट मंजूर का नाही करून घेतले, असा सवाल ठाकरे यांनी सरकारला केला.

राज्यात आणि देशभरात सत्ताधारी समाजामध्ये विद्वेश निर्माण करीत आहेत. लोकसभा निवडणुकीत मुस्लिम आणि बौद्ध समाजाने आम्हाला भरभरून मतदान केले.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मंत्रालयात ध्वजारोहण !

**मुंबई :** देशात ७८ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. राज्यात विविध ठिकाणी ध्वजारोहण पार पडले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ध्वजारोहण करून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते विधान भवन येथे मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी संबोधित करताना मुख्यमंत्री म्हणाले की, राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि येथील नागरिकांच्या कल्याणासाठी राज्य शासन वचनबद्ध आहे. शेतकरी, शेतमजूर, महिला, विद्यार्थी या सर्व घटकांच्या विकासासाठी विविध योजनांच्या माध्यमातून विकासाला चालना देण्याचे काम होत आहे. विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी राज्य शासनाने राबविलेल्या धोरणांची प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे, असे शिंदे यांनी सांगितले.

यावेळी बोलताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, गेल्या दोन वर्षात राज्य शासनाने भरीव कामगिरी केली आहे. विदेशी गुंतवणूक, समाजातील दुर्बल, गोरगरीबांसाठी आखलेल्या नाविन्यपूर्ण योजना या माध्यमातून नागरिकांप्रती असणारी बांधीलकी दाखवून दिली आहे. विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ५ ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्था बनवून जगातली तिसरी अर्थव्यवस्था होण्यासाठी आगेकूच सुरु आहे. त्यामध्ये आपल्या राज्याचा वाटा मोठा असणार आहे. राज्याची वाटचाल त्यादिशेने सुरु असल्याची माहिती त्यांनी दिली.

राज्यातील गुंतवणूकदार,



उद्योजक किंवा सर्वसामान्य नागरिक यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम राज्य शासनाने केले आहे, असे सांगून मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, कृषि, शिक्षण, ऊर्जा, निर्मिती, माहिती तंत्रज्ञान, बांधकाम, पर्यटन, आरोग्य सुविधा, कौशल्य विकास, पायाभूत सुविधा, आरोग्य सेवा या क्षेत्रांमध्ये आपण आमूलाग्र क्रांती आणत आहोत. राज्यात १५ दशलक्ष रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट्य आपण ठेवले आहे. राज्याची लॉजिस्टिक पॉलिसी जाहीर केली आहे. यातून येत्या पाच वर्षात ३० हजार कोटींचा महसूल राज्य शासनाला मिळणार आहे. गुंतवणूकदारांचा विश्वास वाढल्याने राज्यात गुंतवणुकीचा वेग वाढला आहे. गेल्या दोन वर्षात ५ लाख कोटींपेक्षा जास्त गुंतवणुकीसाठी करार झाले आहेत. थेट परकीय गुंतवणुकीत तर आपण देशात प्रथम आहोत. त्या माध्यमातून अडीच लाख रोजगार निर्मिती आपण केली आहे.देशाच्या एकूण उत्पन्नात महाराष्ट्राचा वाटा १४ टक्के आहे. उद्योगात आणि सेवा क्षेत्रात आपले राज्य क्रमांक एकवर आहे. विदेशी पर्यटकांची पसंतीही महाराष्ट्र असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी आवर्जून नमूद केले.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, सुमारे दहा लाख कोटींची पायाभूत सुविधांची कामे राज्यात सुरु आहेत. समृद्धी महामार्गा सारखा गेम चेंजर असणाऱ्या प्रकल्पाचा शेवटचा टप्पा पूर्ण होऊन नागपूर ते मुंबई पूर्ण वाहतूक लवकरच सुरु होणार आहे.

# परळीत २१ ऑगस्टपासून राज्यस्तरीय कृषी महोत्सव

## कृषी, पशु प्रदर्शनासह शेतकरी उपयोगी अनेक उपक्रमांचे आयोजन : कृषी मंत्री धनंजय मुंडे

**मुंबई :** राज्याच्या कृषी विभागातर्फे येत्या २१ ऑगस्टपासून बीड जिल्ह्यातील परळी वैद्यनाथ येथे ५ दिवसीय राज्यस्तरीय कृषी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या कृषी महोत्सवात भव्य राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन पशुप्रदर्शन त्याचबरोबर राज्यभरातील शेतकऱ्यांना मार्गदर्शक अशा अनेक महत्त्वपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.

राज्यातील शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाने कृषी विद्यापीठांच्या माध्यमातून लावलेले नवनवीन शोध, विविध आधुनिक उपकरणे खरेदी करता यावे, शासनाचे व अन्य नवनवीन उपक्रम तसेच विविध उत्पादने यांची माहिती मिळावी या दृष्टीने महोत्सवाचे आयोजन केले आहे.या महोत्सवाचे उद्घाटन २१ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वा. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे.

या कृषी महोत्सवाच्या निमित्ताने विविध आधुनिक यंत्र सामुग्री, ड्रोन फवारणीची प्रात्यक्षिके, नवनवीन संशोधन, चर्चासत्रे तसेच विविध उत्पादने, पशूंच्या विविध प्रजाती यांसह अनेक कृषी उपयुक्त माहिती शेतकऱ्यांना मिळणार आहे.

कृषिमंत्री श्री. मुंडे यांच्याकडून तयारीचा आढावा व पाहणी

मंत्री श्री. मुंडे यांनी परळी येथील शासकीय विश्रामगृहात कृषी महोत्सवाच्या तयारीचा आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी अविनाश पाठक, पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, कृषी विभागाचे सह संचालक श्री. दिवेकर, श्री. मोटे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे , तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्यासह कृषी, महसूल पोलीस अधिकारी उपस्थित होते.

परळी शहरातील बाजार समिती मैदानावर सुरु असलेल्या कृषी महोत्सवाच्या तयारीची मंत्री श्री. मुंडे यांनी पाहणी केली. मुख्य कार्यक्रमासाठी उभारण्यात येत असलेला मंडप, आसन व्यवस्था, त्याचबरोबर शेतकऱ्यांसाठी उभारण्यात येत असलेले शेकडो स्टॉल्स, पार्किग व्यवस्था, भोजन व्यवस्था, सुरक्षा आदी सर्व बाबींची पाहणी करून सर्व व्यवस्थापन चोखपणे करण्याचे निर्देश मंत्री श्री. मुंडे यांनी दिले.

# महायुती सरकारला निवडणुकीची भीती : जयंत पाटलांचा टोला

**मुंबई:** महायुती सरकारला निवडणुकांची भीती वाटते. मागच्या दोन वर्षात या सरकारने ज्या पद्धतीने काम केले आहे त्यामुळे ते निवडणुकीला सामोरे जाण्यास घाबरतात. असा टोला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी लगावला. त्यामुळे ऑक्टोबरमध्ये निवडणुका घेण्याऐवजी दिवाळीनंतरच विधानसभा निवडणुका होण्याची शक्यता आहे, असेही ते म्हणाले.

सत्ताधाऱ्यांनी लोकसभा निवडणुकीत ४०० पारचा नारा दिला. प्रत्यक्षात ते २४० वर थबकले. आंध्र प्रदेश आणि बिहारकडून टेकू मिळाल्याने केंद्रात त्यांचे सरकार सत्तेवर आहे. मात्र, हा टेकू देणारे लोक पलटू आहेत. त्यामुळे हे सरकार किती काळ चालणारा हा प्रश्नच आहे, असेही पाटील म्हणाले.

आगामी विधानसभा निवडणूक ही प्रतिष्ठेची असणार आहे. महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्ष एकत्र राहिले तर आगामी काळात सत्ता आपल्याकडेच येणार आहे. लोकसभा निवडणुकीत सातारा मतदारसंघात पिपाणीला ३७ हजार मते गेल्यामुळे आपली जागा गेली. मुंबईतील आपली एक जागा सत्ताधाऱ्यांनी चोरली. मात्र, विधानसभा निवडणुकीत आपला विजय निश्चित आहे, असा विश्वासही पाटील यांनी व्यक्त केला.

**भाजपच्या दोन आमदारांनी लाटल्या देवस्थानच्या जमिनी**

सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या दोन आमदारांनी देवस्थानच्या जमिनी लाटले आहेत. या गैरप्रकाराला आपण सभागृहात वारंवार वाचा फोडली आहे. अशा जमिनी घेताना नजराणाची रक्कम भरावी लागते. या आमदारांनी नजरान्याची केवळ पन्नास टक्के रक्कम भरली आहे. आता सरकारने नजराणा कमी केला आहे. हे सरकार देवस्थानांच्या जमिनी लाटत आहे, असा आरोपही पाटील यांनी केला.

# डॉक्टर महिला बलात्कार प्रकरणी आझाद मैदानात डॉक्टरांचे आंदोलन

**मुंबई :** कोलकाता येथील आर जी कर मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमधील महिला प्रशिक्षित डॉक्टरच्या बलात्कार आणि हत्येच्या निषेधार्थ शुक्रवारी मार्ड या डॉक्टर संघटनेकडून कडून मुंबई आझाद मैदानात आंदोनल करण्यात आले.

या आंदोलनात निवासी डॉक्टरांसह, बंधपत्रित डॉक्टर, वरिष्ठ निवासी डॉक्टर, प्रशिक्षित विद्यार्थी डॉक्टर मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

डॉक्टरच्या हत्येमुळे देशभरातील निवासी डॉक्टरांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. त्यामुळे या प्रकरणी तातडीने उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी , केंद्रीय आरोग्य संरक्षण



कायदा तातडीने तयार करण्यात यावा व डॉक्टरांना सुरक्षा प्रदान करण्यात यावी अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

देशात ७८ वा स्वातंत्र्य दिन साजरा केला जात असताना हॉस्पिटलमधील महिला प्रशिक्षित डॉक्टरवर बलात्कार करून तिची हत्या केली जाते. असा स्वातंत्र्य दिन साजरा करून काय उपयोग असा संतप्त सवाल डॉ .सायली तरटे यांनी यावेळी सरकारला केला. तर डॉ. संतोष कदम म्हणाले की, डॉक्टरांना मारहाण करण्याच्या घटना यापूर्वी सायन रुग्णालय व यवतमाळ मध्ये घडल्या आहेत. डॉक्टरांना मारहाण झाली की सीसीटीव्ही कॅमेरे लावले जातात. त्यानंतर सहा महिन्यांत सीसीटीव्ही कॅमेरे बंद पडतात.

इंडियन मेडिकल असोसिएशनचे दिल्ली उपाध्यक्ष डॉ. अनिल पाचेकर यांनी या दुर्दैवी घटनेचा निषेध केला असून शनिवार १७ आगस्ट रोजी सायंकाळी ६ पासून २४ तास देशभरातील सर्व रुग्णसेवा बंद करण्यात येणार असल्याची घोषणा केली. या बंदमुळे देशभरासह राज्यातील रुग्णसेवा कोलमडणार आहे.

या मोर्चात मार्डचे सचिव डॉ. सौरभ संजनवाला, डॉ

# विनेश फोगटचं भारतात स्वागत

**नवी दिल्ली :** गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेली भारताची कुस्तीपटू विनेश फोगटचं भारतात आगमन झालं आहे. आज सकाळी १०:३० वाजता विनेश फोगटचं भारतात आगमन झालं. ती पॅरिसहून दिल्ली विमानतळावर पोहोचली. विमानातून खाली उतरताच विनेशला अश्रू अनावर झाले. दिल्ली विमानतळावर तिचं जंगी स्वागत करण्यात आलं. तिला घेण्यासाठी बजरंग पुनिया, साक्षी मलिक आणि इतर दिग्गज खेळाडू विमानतळावर आले होते.

नुकत्याच पार पडलेल्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कुस्तीपटू विनेश फोगटनं पन्नास किलो वजनी गटात भारताच प्रतिनिधीत्त्व केलं. तिने उत्तम खेळ करत फायनलमध्ये धडक मारली, मात्र सुवर्णपदकापासून अवघं एक पाऊल दूर असताना तिला मोठा धक्का बसला, तिचं वजन शंभर ग्रॅमनं जास्त भरल्यामुळे तिला ऑलिम्पिक स्पर्धेतून अपात्र ठरवण्यात आलं. त्यामुळे तिनं ज्या स्पर्धाकाचा सेमी फायनलमध्ये पराभव केला होता, त्याला फायनलमध्ये खेळण्याची



संधी मिळाली.

दरम्यान याविरोधात तीनं कोर्ट ऑफ आर्बिशनकडे अपील केलं, आपल्याला रौप्य पदक विभागून मिळावं अशी तीची मागणी होती. मात्र इथेही तिची याचिका फेटाळण्यात आली. या प्रकरणात ज्येष्ठ वकील हरिश साळवे यांनी विनेशची बाजू मांडली. तिचं आता भारतात आगमन झालं आहे, तीचं भव्य असं स्वागत करण्यात आलं.

# स्वातंत्र्यदिनानिमित्त ज्येष्ठांचा अनोखा कृतज्ञता सोहळा

**ठाणे :** ज्येष्ठ नागरिकांकडे अनुभवाची मोठी शिदोरी असून नव्या पिढीने तासनतास मोबाईल घेऊन बसण्यापेक्षा रोज एक तास आपल्या आजी - आजोबांसोबत घालवण्याचे आवाहन आमदार विश्वनाथ भोईर यांनी केले आहे. देशाच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित ज्येष्ठ नागरिकांच्या कृतज्ञता सोहळ्यात ते बोलत होते. या कार्यक्रमाला ज्येष्ठ नागरिकांनी प्रचंड गर्दी केली होती.



कल्याण पश्चिमेच्या वायले नगर येथील वायले सभागृहात झालेल्या या कृतज्ञता सोहळ्याला कल्याण शहर आणि परिसरातील शेकडो ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे यांच्या हस्ते उपस्थित ज्येष्ठ नागरिकांचा यावेळी सन्मान करण्यात आला. भेटवस्तू आणि कृतज्ञता पत्र देऊन यावेळी उपस्थित ज्येष्ठ नागरिकांचा गौरव करण्यात आला.

आज कल्याण शहराचा जो चौफेर विस्तार आणि विकास होताना दिसतोय त्यामधे आपल्या समाजातील ज्येष्ठ नागरिकांचेही मोठे योगदान आहे. या सर्व ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या उमेदीच्या काळात हे शहर घडवण्यासाठी आपलं आयुष्य खर्च केलं आहे. तर आपल्या आजवरच्या वाटचालीत हे ज्येष्ठ नागरिक आणि त्यांच्या अनुभवाचा फार मोठा वाटा असल्याची प्रांजळ कबुली आमदार विश्वनाथ भोईर यांनी यावेळी दिली.

तर काळानुरूप समाजात बदल होत असतात. त्या काळाच्या ओघामध्ये आपले महत्त्व कमी झाले तरी ज्येष्ठ नागरिकांनी अजिबात निराश होऊ नये. आहे त्या परिस्थितीचा स्विकार करून ज्येष्ठ नागरिकांनी आपले पुढचे आयुष्य सुखी आणि समाधानी जगले पाहिजे असे आवाहन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे यांनी यावेळी केले.या कार्यक्रमाला आमदार विश्वनाथ भोईर यांच्यासह जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, अरविंद मोरे, महिला संघटक छायाताई वाघमारे, माजी नगरसेवक संजय पाटील, जयवंत भोईर, सुनिल वायले, उपशहर प्रमुख सुनिल खारुक, नेत्रा उगले यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संभाजी ब्रिगेडचे राज्यस्तरीय अधिवेशन

**मुंबई :** गेल्या २७ वर्षांपासून महाराष्ट्राच्या इतिहास संशोधन, सांस्कृतिक, सामाजिक व अर्थकारणाच्या क्षेत्रात सातत्याने काम करणाऱ्या संभाजी ब्रिगेड संघटनेने नवी मुंबईत एकदिवसीय राज्यस्तरीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संघटनेचे प्रदेशाध्यक्ष व अधिवेशनाचे निमंत्रक प्रविणदादा गायकवाड यांनी शुक्रवारी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.



गुरुवार २२ ऑगस्ट रोजी वाशी (नवी मुंबई) येथील विष्णुदास भावे नाट्यगृह या ठिकाणी सकाळी १० ते सायंकाळी ७ या वेळेत हे अधिवेशन पार पडणार आहे.

संभाजी ब्रिगेडच्या बदलाचा मागोवा व भविष्याचा वेध या विषयावर चार सत्रात विविध क्षेत्रातील मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. अधिवेशनाचे उदघाटन आ. रोहित पवार, खा.अमोल कोल्हे, आ. शशिकांत शिंदे तसेच सिने अभिनेते सयाजो शिंदे, निखिल चव्हाण व गौरव मोरे आदि मान्यवरांच्या हस्ते पार पडणार आहे.

पहिल्या सत्रामध्ये पत्रकार अभिजीत करंडे हे गोष्ट पैशापाण्याची या पुस्तकाचे लेखक प्रफुल्ल वानखेडे यांची मुलाखत घेणार तर दुसऱ्या सत्रामध्ये ज्येष्ठ संपादक श्रीराम पवार हे महाराष्ट्र धर्म काय शिकवतो? या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. तिसऱ्या सत्रामध्ये निर्भिड पत्रकार निरंजन टकले हे गांधीजीच्या स्वप्नातील भारत या विषयावर संबोधित करणार तर लेखक चंद्रकांत झटाले या सत्रासाठी उपस्थित राहणार आहेत. चौथ्या सत्रामध्ये ज्येष्ठ संपादक ज्ञानेश महाराव हे भारतीय राज्यघटनेला अभिप्रेत असलेल्या विचारधारेची लोकशाही या विषयावर आपले मनोगत व्यक्त करणार असून खा. भास्कर भगरे व सामाजिक कार्यकर्ते प्रदिप सोळुंके हे या सत्रामध्ये उपस्थित असणार आहेत.

ज्येष्ठ नेते शरद पवार याच्या हस्ते व माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या विशेष उपस्थितीत कोल्हापूरचे नवनिर्वाचित लोकसभा खासदार श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांचा शाही सन्मान सोहळा पार पडणार आहे. अधिक माहिती, नावनोंदणी व संपर्कासाठो ारालहरक्षळलीळसरवश.ारी या संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन निमंत्रक प्रविणदादा गायकवाड यांनी केले आहे. यावेळी मुंबई अध्यक्ष सागर भोसले सह सर्व पदाधिकारी उपस्थित होते.



# लोकांच्या सेवेसाठी महसूल पंधरवाड्याचे आयोजन : भंडारी

**मुंबई :** १ते १५ ऑगस्ट दरम्यान महसूल विभागामार्फत मार्फत महसूल पंधरवाड्याचे आयोजन केले असल्याची माहिती निवासी नायब तहसीलदार ममता भंडारी यांनी दिली त्या देऊळगाव राजे येथे या कार्यक्रमात बोलत होत्या, लोकांची वेळेत कामे व्हावी आणि वेळ आणि पैसा यांचे बचत व्हावी म्हणून अशा प्रकारचे उपक्रम राबवण्यात येतात अशी माहिती भंडारी यांनी दिली .

या विभागांतर्गत शालेय विद्यार्थ्यांना विविध दाखले वाटप करणे ,रेशन कार्ड विषयी शिबिर यामध्ये नाव कमी करणे किंवा वाढवणे ,मतदार नोंदणी अभियान, शासकीय कामात स्वच्छता शिबिर ,महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन, सैनिकांची प्रलंबित कामे व त्याचा निपटारा तसेच स्वामी चिंचोली आणि बोरी पार्धी येथे दिव्यांगांसाठी विविध योजना अशा विविध योजना या महसूल पंधरवाड्या अंतर्गत राबवल्या आहेत अशी माहिती भंडारी यांनी दिली. प्रत्येक मंडळा ठिकाणी या महास्वराज्य शिबिराच्या आयोजन करण्यात आले होते.

देऊळगाव राजे या ठिकाणी विविध ७७ कामांचा निपटार करण्यात आला. यावेळी हरिभाऊ ठोंबरे, राधिका पाहणे, अभिमन्यू गिरमकर, पंढरीनाथ पासलकर, विष्णुपंत सूर्यवंशी, पंकज बुराडे, बाबूराव पासलकर ,कानिफ सूर्यवंशी, त्रिंबक गिरमकर ,दादा गिरमकर महसूल चे सर्व अधिकारी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते, सूत्रसंचालन आणि आभार दिनेश

# मनसेच्या उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली

## शेतकरी वर्ग संतप्त, उपोषणाचा पाचवा दिवस

**पाटण :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष गोरख नारकर यांचे पनामा पवनचक्की कंपनी व महाराष्ट्र उर्जा विकास अधिकरण पुणे यांच्या विरोधात आमरण उपोषण गेली पाच दिवस सुरु आहे. आज पाचव्या दिवशी उपोषण कर्ते यांची प्रकृती अस्वस्थ झालेली असून पनामा पवनचक्की कंपनी व मेडा विभाग पुणे यांना सदर उपोषणाचे सोय सुतक नाही अस दिसून येत आहे.



सलग पाचव्या दिवशी उपोषणकर्त्यांची तब्बेत बिघडली असून आरोग्य विभागाचे कर्मचारी त्यांची तपासणी करुन आलेले आहेत. सदर उपोषण कर्ते यांना पोटदुखीचा त्रास जाणवू लागला असून वैद्यकीय तपासणी केली असता उपोषणकर्त्यांची यदाकदाचित जिवितहानी झाल्यास प्राथमिक आरोग्य केंद्र जबाबदार राहणार नाही. ही बाब गांभिर्याने घेऊन वरिष्ठांनी यावरती उचित कार्यवाही करावी अशी माहिती मोरगिरी आरोग्य विभागाचे वैद्यकीय अधिकारी डॉ नागेश्वर ननावरे यांनी तालुका अधिकार्यांना कळवली आहे.

मौजे पाचगणी याठिकाणचे शेतकरी संतप्त झालेले असून पाच दिवस झाले तरी प्रशासन डोळे झाकून गप्प बसले आहे. फक्त जिल्हाधिकारी यांच्या सोबत बैठक लावणे ही आमची मागणी नाही. सदर टॉवर तात्काळ बंद करावा. पनामा पवनचक्की कंपनीच्या दबावाला मेडा पुणे विभाग घाबरत आहे. बलाढ्य कंपनी अधिकार्यांना जुमानत नाही ती आमच्या सारख्या गरिब शेतकर्यांना काय जुमानणार आहेत? तालुक्यातील प्रांत, तहसीलदार यांना आमचे काही सोयसुतक आहे की आम्ही मेल्यानंतर सगळं प्रशासन आम्हाला पाहायला येणार आहे? आम्हाला न्याय देणारे मनसेचे तालुकाध्यक्ष गोरख नारकर आमच्या साठी जीवाची बाजी लावून आम्हाला न्याय देण्याचा प्रयत्न करत आहेत. आज पाचवा दिवस आहे त्यांना शारीरिक त्रास जाणवू लागला आहे जर उपोषण कर्तेयांना काही बरे वाईट झाले तर उपोषण ठिकाणी सदर टॉवर नंबर २५ येथे फास घेऊन आत्महत्या करु असे प्रसारमाध्यमांना सांगितले आहे.

# अतिवृष्टीत दगावलेल्याच्या वारसांना शासनाची तातडीने मदत..! अनंत गुरव

**पाटण :** पालकमंत्री ना शंभूराज देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली पाटण तालुक्यात नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीत तालुक्यातील मयत झालेल्या व्यक्ती, जनावरे यांना राज्य शासनाच्या वतीने तातडीने शासनाच्या नियमानुसार सानुग्रह अनुदान वाटप करण्यात आले असल्याची माहिती पाटण च्या महसूल विभागाने दिली.

या साठी पाटण तालुक्याचे मावळते उपविभागीय अधिकारी मा. सुनील गाढे,नूतन उपविभागीय अधिकारी सोपान टोपें, यांचे मार्गदर्शन व तालुका पशु संवर्धन अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, तालुका प्रशासन यांचे सहकार्य झाले.

यामध्ये मौजे कुसवडे पळासरी येथील अशोक धोंडीबा मिसाळ वय वर्षे २३ हा दिनांक ०३/०८/२०२४ रोजी पुराच्या पाण्यात वाहून मृत्युमुखी पडला होता त्यांचे वारस धोंडीबा बापू मिसाळ यांना शासन नियमानुसार रक्कम रुपये ४ लक्ष अनुदान वाटप करण्यात आले तर

मौजे गवळीगनर येथे दिनांक २०/०६/२०२४ रोजी २ म्हैशी ओढयातून वाहून मृत्युमुखी पडल्या होत्या त्यांना ७५हजार रुपये,नाणेल येथे दिनांक २३/७/२०२४ रोजी ओढयातून वाहून गेले त्यांच्या मालकाला ७५ हजार रुपये,नानेल येथील २ शेळ्या पुराच्या पाण्यातून वाहून गेल्या त्यांना ८००० रुपये अनुदान वाटप,वाघजाईवाडी येथे दिनांक २३/७/२०२४ रोजी ओढयातून १ रेडकू आणि म्हैस वाहून मयत झाली त्यांना ५७ हजार ५०० अनुदान वाटप, आंबरग येथे दिनांक २४/७/२०२४ रोजी ओढयातून १ शेळी वाहून मयत झाली त्यांच्या मालकाला एकूण ४००० अनुदान वाटप,शेंडेवाडी येथे दिनांक २५/०७/२०२४ रोजी ओढयातून वाहून १ म्हैस मयत झाली त्यांना एकूण रक्कम रुपये ३७५०० अनुदान वाटप,मौजे जाधववाडी मेंढ या ठिकाणी दिनांक २६/०७/२०२४ रोजी १ कालवड (वासरु) मृत्युमुखी पडले त्यांना शासन नियमानुसार एकूण रक्कम रुपये २० हजार रुपये अनुदान वाटप करण्यात आले.

तर मौजे बहुले येथे २४/०७/२०२४ रोजी झालेल्या अतिवृष्टीत एक पाळीव गाढव मृत्युमुखी पडले त्याच्या मालकाला

शासन नियमानुसार एकूण रक्कम रुपये२० हजार रुपये असे एकूण ६ लाख ९४ हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान वाटप करण्यात आल्याची माहिती तहसीलदार अनंत गुरव यांनी दिली.

दरम्यानमौजे पाचगणी येथे दिनांक २७ जुलै रोजीच्या अतिवृष्टीत १ शेळी तर २८ जुलै च्या अतिवृष्टीत १ म्हैस मृत्युमुखी पडली असून यांच्या मालकांना अनुदान रक्कम वाटपाचे काम सुरू असल्याची माहितीही महसूल विंभागाकडून देण्यात आली.

# लाडकी बहीण योजनेवरून सुप्रिया सुळेंचं सरकारला खुलं चॅलेंज

**मुंबई :** राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या नेत्या, खासदार सुप्रिया सुळे यांनी पुन्हा एकदा मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेवरून राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. त्यांनी ट्विट करत महायुती सरकारवर निशाणा साधला. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या रक्कम अदा करण्याच्या कार्यक्रमाला हजर न राहणाऱ्या बहिणींचे फॉर्म रद्द करण्याचे धमकी देणारे हे स्वत:ला 'भाऊ' म्हणवित आहेतष्ठ' असं सुप्रिया सुळे यांनी म्हटलं आहे.

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या रक्कम अदा करण्याच्या कार्यक्रमाला हजर न राहणाऱ्या बहिणींचे फॉर्म रद्द करण्याचे धमकी देणारे हे स्वत:ला 'भाऊ' म्हणवितात आहेतष्ठ बहिणीला कार्यक्रमाला बोलाविणार आणि त्यांची गर्दी दाखवून स्वत:ची पाठ थोपटून घेणारष्ठ अरे सत्तेत बसलेल्या भावांनो, 'बहिण-भावाचं' नातं एवढं स्वस्त नसतं. बहिणींना प्रेमानं काही मागितलं तर बहिण त्याला नाही म्हणत नाही. पण तिला धमक्या देऊ लागलात तर ती कुणालाच घाबरत नाही हे लक्षात ठेवा. हिंमत असेल तर या कार्यक्रमाला न जाणाऱ्या एकातरी बहिणीचा फॉर्म रद्द करुन दाखवाच.' असं ट्विट सुप्रिया सुळे यांनी केला आहे.

दरम्यान एक मेसेज व्हायरल होत आहे. ज्यामध्ये 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी महिलांना लाभाची रक्कम अदाकरणाच्या अनुषंगाने शनिवारी दिनांक १७ ऑगस्ट २०२४ रोजी श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल बालेवाडी स्टेडियम पुणे येथे राज्यस्तरीय शुभारंभाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. तरी ज्या महिलांनी हा फॉर्म भरला आहे व त्याचे रज्जेदन् मेसेज आला आहे त्यांनी या कार्यक्रमाला हजर राहावे यासाठी पुणे महान

## उच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात सीबीआयकडून अक्षम्य दिरंगाई

**पुणे :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खुनाच्या आरोपातून पुरेशा पुराव्यांअभावी तीन आरोपींना पुणे सत्र न्यायालयाकडून दोषमुक्त करण्यात आले. त्यानंतर शंभर दिवसांचा कालावधी उलटून गेला तरी केंद्रीय गुन्हे अन्वेषण (सीबीआय) विभागाने आरोपींच्या निर्दोष सुटकेच्या विरोधात उच्च न्यायालयात अपील दाखल केलेले नाही. ते तातडीने दाखल करण्याची मागणी दाभोलकर कुटुंबीय आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने शनिवारी केली. 'या आरोपींच्या गुन्ह्यातील सहभागाचा वाजवी संशय आहे. परंतु, विश्वासार्ह पुराव्यांद्वारा त्यांचा गुन्ह्यातील सहभाग सिद्ध करण्यात तपास यंत्रणा अयशस्वी ठरलेली आहे', असे कठोर शब्द सत्र न्यायालयाने निकालपत्रात वापरल्यानंतर देखील सीबीआयकडून अजूनही अपील

# वीर जवान तुषार घाडगे अनंतात विलीन

**कोरेगाव :** कोरेगाव तालुक्यातील बोरगाव येथील जवान तुषार राजेंद्र घाडगे (वय ३३) यांच्यावर शोकाकुल वातावरणात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शहीद जवान यांची पत्नी भाग्यश्री घाडगे, सैन्य दलात कार्यरत असणारे थोरले बंधू विशाल व कुटुंबियांनी केलेला आक्रोश काळीज पिळवटून टाकणारा होता.



अमर रहे अमर रहे शहीद जवान अमर रहे, जब तक सूरज चाँद रहेगा जवान तुषार घाडगे आपका नाम रहेगा आदी घोषणा देत जवान तुषार घाडगे यांची गावातून जड अंतकरणाने शोकाकुल वातावरणात अंत्ययात्रा काढण्यात आली.

जवान तुषार घाडगे हे भारतीय सेना संलग्न बॉर्डर रोड ऑर्गनायझेशन (जीआरइएफ) मध्ये अरुणाचल प्रदेश येथे सेवा बजावत होते. त्यांनी सात वर्ष सैन्य दलात कार्यतत्पर सेवा बजावली मंगळवार, दि.१३ ऑगस्ट रोजी तुषार घाडगे व त्यांचे दोन सहकारी दुपारी दीड वाजता सुमारास सैन्य दलाकरता रस्ता बनवण्याचे कामात ड्रिलिंग चे काम करीत होते.कर्तव्य बजावत असताना अचानक झालेल्या भूस्खलनामध्ये ११६ ठउउ मध्ये डझच् ठजउघ ६० मीटर स्लाईड पॉईंट मध्ये एक स्लाईड आला आणि त्यामध्ये तुषारच्या डोक्यात दगड लागला. गंभीर जखमी अवस्थेत त्याला टिप्पर मधून ठउउ मध्ये आणण्यात आले. आणि त्यानंतर म्बुलन्स मधून हॉस्पिटल मधून घेऊन जात असताना त्याचे अपघाती निधन झाले. यावेळी त्याच्या एका सहकार्याला उपचारासाठी आसाम दिब्रुगड येथे हलविले असून त्याच्या अन्य दुसरा साथीदारही गंभीर जखमी झाला आहे. शुक्रवारी सकाळी त्यांचे पार्थिव बोरगाव येथे सैन्यदलाच्या ताफ्याबरोबर आणण्यात आले. यावेळी गावातील युवकांनी रहिमतपूर ते बोरगाव पर्यंत दुचाकी रॅली काढली. प्रथम त्यांच्या राहत्या घरासमोर पार्थिव नेण्यात आले. त्यानंतर पार्थिव झेंडूच्या फुलांनी व हारांनी सजवलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीमधून स्मशानभूमित आणण्यात आले. यावेळी अमर रहे अमर रहे शहीद जवान अमर रहे ,जब तक सूरज चांद रहेगा शहीद जवान तुषार घाडगे आपका नाम रहेगा आदी घोषणा देण्यात आल्या. यावेळी बोरगाव, वाठार, रहिमतपूर परिसरातील नागरिकांनी अंत्यदर्शनासाठी गर्दी केली होती. बोरगाव येथील स्मशानभूमीमध्ये प्रशासनाच्या वतीने कोरेगावचे तहसीलदार डॉक्टर संगमेश कोडे यांनी पुष्प चक्र अर्पण केले. यावेळी तालुक्यातील शासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी, सैन्यदलातील अधिकारी व सैनिक आदींनी जवान तुषार घाडगे यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

राष्ट्राच्या सीमा सुरक्षित ठेवण्यासाठी जे रस्ते बांधण्याचे काम चालू होते त्यावेळी तुषारच्या झालेले बलिदान आपल्या सर्वांसाठी अभिमानास्पद आहे. त्यांच्या पत्नी आई व कुटुंबाला झालेले दुःख देखील गहिवरून आणणारे आहे. शूर जीवनसाथी व उमदा पोरगा, पालक पिता, भाऊ गमावण्याचे दुःख अपरिमित आहे. झालेले दुःख पचवून जीवन पुढे चालू ठेवण्यासाठी वीर जवानाच्या कुटुंबाला बळ देऊयात अशी भावपूर्ण श्रद्धांजली अनेक मान्यवरांनी व्यक्त केली.

जवान तुषार घाडगे यांना तीन वर्षीय मुलगा शिवांश च्या उपस्थितीत सैन्य दलात कार्यरत असणारे थोरले बंधू विशाल यांनी कुटुंबियांच्या उपस्थितीत मुखाग्नी दिला.

त्यांच्या पश्चात आई, भाऊ विशाल,

# रिपब्लिकन पक्षाच्या आठवले गटाच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीत जाहीर

**कोरेगाव :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) राष्ट्रीय अध्यक्ष मा. दिपकभाऊ निकाळजे यांच्या आदेशानुसार व सातारा जिल्हाध्यक्ष तथा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष दादासाहेब ओव्हाळ यांच्या मार्गदर्शनाखाली व कोरेगाव तालुका अध्यक्ष नितीन बोतालजी यांच्या उपस्थित कोरेगाव या ठिकाणी खालील कोरेगांव तालुक्यावर काही नवनियुक्त पदे निवड करण्यात आले. त्यावेळी सातारा जिल्हाध्यक्ष तथा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष दादासाहेब ओव्हाळ यांनी पदनियुक्त पत्र देऊन पुढील वाटचाली शुभेच्छा दिल्या, त्यानंतर दादा साहेब ओव्हाळ व कोरेगाव तालुका अध्यक्ष नितीन बोतालजी, सातारा जिल्हा सरचिटणीस संतोष भाऊ जाधव, सातारा जिल्हा सचिव किरण बगाडे, यांनी नवीन पदाधिकाऱ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देवून कोरेगांव तालुका मधील नवीन पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना पक्ष कश्या पद्धतीने चालवावं आणि वाढेल व गोरगरीब अडाणी पिचलेल्या समाजाला कश्या पद्धतीने न्याय देता येईल यावर काही मार्गदर्शन करण्यात आले, त्यानंतर तथागत गौतम बुद्ध, संत तुकाराम महाराज, छत्रपती शिवाजी महाराज,शाहू फुले आंबेडकर तसेच अण्णा भाऊ साठे, संत गाडगेबाबा, संत कबीर, व माता जिजाऊ, माता सावित्रीबाई, माता रमाई, फातिमा शेख या महापुष्यांचे समाजासाठी कश्या पद्धतीचे योगदान आहे, हे कार्यकर्त्यांने पटवून दिले,

त्यावेळी कोरेगांव तालुका मध्ये काही कार्यकर्त्यांना नवीन पदे नियुक्ती करण्यात आले ते पुढील प्रमाणे, सागर चव्हाण, कोरेगाव तालुका युवक सचिव.साहिल संतोष बोतालजी, कोरेगांव शहर अध्यक्ष. अशपाक काशिमआली कुरेशी अल्पसंख्याक कोरेगांव तालुका अध्यक्ष. अल्पसंख्याक कोरेगाव तालुका कार्याध्यक्ष निहाल युन्नूस मुजावर. अल्पसंख्याक कोरेगाव शहर अध्यक्ष अब्दुल आय्याज कागदी.कोरेगाव तालुका वाहतूक आघाडी अध्यक्ष सूरज माकार. येवढ्यांची निवड करण्यात आली

त्याच्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज व डॉ बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करन्यात आले व महापुरुषांच्या नावाचा मोठ मोठयाने जयघोष करण्यात आला, त्यावेळी सातारा जिल्हा अध्यक्ष तथा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष दादासाहेब ओव्हाळ, कोरेगाव तालुका अध्यक्ष नितीन बोतालजी, कामगार आघाडी जिल्हा अध्यक्ष मदन बापू खंकाळ, महाराष्ट्र युवक उपाध्यक्ष सुरेश पवार,सातारा जिल्हा सरचिटणीस संतोष भाऊ जाधव, सातारा जिल्हा सचिव किरण बगाडे, जिल्हा युवक अध्यक्ष प्रशांत शिवचरण, खटाव तालुका अध्यक्ष, सागर भाऊ भिलारे, कामगार आघाडी कार्याध्यक्ष राम मदाळे, सातारा अल्पसंख्यक सलीम बागवान, खटाव तालुका युवक अध्यक्ष अमोल बुधावले, कराड युवक अध्यक्ष संतोष भिसे, कराड शहर अध्यक्ष रवी भोसले, कोरेगांव तालुका उपाअध्यक्ष लक्ष्मण माने, कोरेगाव तालुका कार्याध्यक्ष पंकज जावळे, कोरेगाव तालुका संघटक दीपक पाटोळे, कोरेगाव तालुका युवक उपाध्यक्ष ऋतुराज वायदंडे, कोरेगाव तालुका युवक कार्याध्यक्ष दीपक खरात, कोरेगाव अल्पसंख्याक तालुका उपाध्यक्ष

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# सातार्‍यात विमानतळ आणि विमान उद्योग यावेत : भाजपाची मागणी

**सातारा :** सातारा विधानसभा क्षेत्रात आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ , आणि विमान तयार करण्यासाठी आणि वाहतुकीसाठी लागणारे स्पेअर पार्ट्स उत्पादित किंवा तयार करण्याचे उद्योग सातारा विधानसभा क्षेत्रात तयार करावेत अशी मागणी भारतीय जनता पार्टी , सातारा शहराध्यक्ष विकास गोसावी यांनी , केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री ना श्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे कराड येथील बैठकीमध्ये केली

सातारा जिल्हा हा पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण यांना जोडणारा महत्त्वाचा जिल्हा असल्यामुळे या ठिकाणची औद्योगिक वसाहत सुद्धा खूपच महत्त्वाची आहे, जर सातारा विधानसभेत आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ झाले तर भारतातल्या इतर राज्यातील आणि आंतरराष्ट्रीय उद्योग सातार्‍यात येतील आणि सातार्‍याच्या एमआयडीसीचा तसेच सातार्‍याचा विकास होऊन सातार्‍यातील युवकांना कामगारांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीमध्ये उद्योगांमध्ये काम करण्याची संधी मिळणार आहे

त्याच प्रमाणे ,सातारा शहर आणि तालुका , महाराष्ट्रातील एक अत्यंत महत्त्वाचे ऐतिहासिक दर्जाचे शहर आहे, सातारा शहरा पासून जवळच युनेस्को आणि आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त दर्जाचे कास पुष्प पठार असून सातारा विधानसभा क्षेत्राला निसर्ग संपत्तीची भरपूर देणगी लाभलेली आहे, या निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेण्यासाठी महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण भारत देशातील आणि विदेशातील पर्यटक सुद्धा मोठ्या प्रमाणावर येत असतात , या पर्यटकांना मुंबई किंवा पुणे या ठिकाणी विमानाने येऊन रस्त्याने प्रवास करावा लागतो , त्यामुळे काही पर्यटक टाळाटाळ करतात आणि याच कारणामुळे सातार्‍याच्या निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेण्यास मुकतात , त्यामुळे पर्यटन वाढीसाठी विमानतळ महत्वाचे ठरणार आहे. तसेच ,विमान तयार करण्यासाठी आणि वाहतुकीसाठी लागणारे स्पेअर पार्ट्स उत्पादित किंवा तयार करण्याचे उद्योग सातार्‍यात आले तर त्यामुळे सातार्‍यातील युवकांना रोजगार उपलब्धतेसाठी खूप मोठा हातभार लागणार आहे या आणि इतर सर्व विषयांचा विचार करून सातारा विधानसभा क्षेत्रात आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ व्हावे अशी मागणी करण्यात आली यावेळी सातारा विधानसभा निवडणूक प्रमुख अविनाश कदम , जिल्हा सरचिटणीस विठ्ठल बलशेटवार, सातारा ग्रामीण पश्चिम मंडल अध्यक्ष महेश गाडे, जावळी मंडल अध्यक्ष श्रीहरी गोळे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष आणि नगरसेवक धनंजय जांभळे, ऍड प्रशांत खामकर, राहुल शिवनामे, धनंजय पाटील, सातारा शहर सरचिटणीस प्रवीण शहाणे, नितीन कदम , सातारा ग्रामीण सरचिटणीस वैभव यादव , युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष विक्रम बोराटे, सोशल मीडिया अध्यक्ष कृणाल मोरे उपस्थित होते.

# बारामतीच्या मोठ्या ताईंना कावीळ झाल्यानंतर जसं सगळीकडे पिवळं दिसतं त्याप्रमाणे दिसू लागल आहे : चित्र वाघ

**कोरेगांव :** बारामतीच्या मोठ्या ताईंना कावीळ झाल्यानंतर जसं सगळीकडे पिवळं दिसतं त्याप्रमाणे त्यांना दिसू लागला आहे जर त्यांच्या पती देवांनी काही केलंच नसेल तर घाबरायची आणि लोकांना सांगायची गरज काय असा टोला चित्रा वाघ यांनी सुप्रिया सुळे यांच्या मिस्टरांना इन्कम टॅक्सची नोटीस आल्याच्या प्रश्नावर केला.

रहिमतपूर येथे सौ चित्रलेखा माने कदम यांनी आयोजित केलेल्या महिला मेळाव्या नंतर आयोजित पत्रकार परिषदेत महाराष्ट्र राज्य भाजपा महिला मोर्चा अध्यक्ष सौ चित्रा वाघ बोलत होत्या.

यावेळी सौ चित्रलेखा माने कदम, सातारा जिल्हा महिला भाजप पदाधिकारी बहुसंख्येने महिला उपस्थित होत्या .

यावेळी चित्रा वाघ म्हणाल्या की, सरकार विरोधात बोलले की ईडीची नोटीस येते असे खासदार सो सुप्रिया सुळे म्हणाल्या, यावर त्यांनी टिप्पणी करीत




त्यांच्या पती देवाने काही केलं नसेल तर घाबरायची आणि लोकांना सांगायची गरजच काय असा प्रतिरोधक टोला लगावला. भारतीय जनता पार्टीमध्ये महिलांना नेहमीच प्राधान्य दिले जाते, सगळ्यात जास्त महिला आमदार या भारतीय जनता पार्टीमध्ये आहेत. आणि ज्यावेळी विधान परिषदेत होते त्याही वेळेला महिलांना संधी दिली जाते. आमचे नेतृत्व एवढे विशाल की त्यामुळे विधानसभेच्या या निवडणुकीमध्ये सुद्धा निश्चित स्थान दिले जाते.

यशोमती ताई यांनी राणादांपत्य ब्लॅकमेल आहे या वक्तव्यावर बोलताना चित्रा वाघ म्हणाले की यशोमती ताई काय बोलतील काय बोलणार नाही त्याचा काही भरोसा नाही त्यांना आमचे नाव सुद्धा धड माहीत नाहीत त्यामुळे अशा माणसांवर विश्वास न ठेवलेलाच बरा.

राहुल गांधींनी खटाखट खटाखट पैसे देणार या योजनेसाठी त्यांच्या ऑफिस समोर रांगा लागल्या परंतु आम्ही खटाखट नाही तर पटापट पैसे देणार आहोत, याच महिन्यात १७ तारखेला आम्ही महिलांच्या खात्यात पैसे वर्ग करणार आहोत. आम्ही आणलेल्या योजनांना महिलांकडून प्रतिसाद मिळत असल्याने विरोधकांच्या पोटात दुखू लागल असल्याचा घणाघात त्यानी यांनी यावेळी केला.

जिल्ह्यामध्ये महिलांचे संघटन करताना सौ चित्रलेखा माने कदम यांनी चांगली भरारी घेतली आहे त्यांना विधानसभेच्या निवडणुकीत संधी देणार काय? याचे सगळे याचे सगळे निर्णय जे आहेत प्रदेशाध्यक्ष घेत असतात चित्रलेखा ताई या एका अनुभवी अशा राजकारणी आहेत अतिशय चांगल्या काम करतात आणि त्यामुळे प्रत्येक वेळेला कुठे ना कुठे संधी देण्याचं काम हे पक्षाच्या माध्यमातून होत असतं त्याच पद्धती चित्रलेखाताई नाही संधी मिळेल असं मला विश्वास असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

आज सातारा जिल्ह्यातील रहिमतपूर येथे महिला मेळा आयोजित केला होता या मेळाव्यानंतर चित्राताई वाघ या पत्रकारांशी बोलत होत्या.

# क्राईम

## सिव्हिल हॉस्पिटलमध्ये चोरी करणार्‍या विरोधात गुन्हा

**सातारा :** सिव्हिल हॉस्पिटल मध्ये चोरी करणार्‍या चोरट्या विरोधात सातारा शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १४ रोजी संध्याकाळी सात वाजण्याच्या सुमारास सौद अहमद खान रा. शाहूनगर, गोडोली, सातारा हा सिव्हिल हॉस्पिटल, सातारा येथील पीएम रूम येथे अंदाजे आठ हजार रुपये किंमतीच्या दोन हायड्रोलिक कॉट चोरताना आढळून आला. अधिक तपास पोलीस हवालदार मेचकर करीत आहेत.

## आईस मारहाण केल्याप्रकरणी मुलावर गुन्हा

सातारा : आईस मारहाण केल्याप्रकरणी मुलाविरोधात शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १४ रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास संगीता अशोक नलवडे राहणार मंगळवार पेठ सातारा या राहत्या घरात झोपलेले असताना त्यांचा मुलगा मयूर अशोक नलवडे हा दारू पिऊन आला. घरात आल्यानंतर त्याने संगीता नलावडे यांना शिवीगाळ करत त्यांना दगडाने मारहाण केली. तसेच जिवंत ठेवणार नाही, अशी धमकी दिली असल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. अधिक तपास पोलीस हवालदार वाघ करीत आहेत.

## मारहाण करुन नुकसान केल्याप्रकरणी एकाविरोधात गुन्हा

सातारा : जुन्या वादाच्या कारणातून किराणा दुकानदाराला काठीने मारहाण करत दुकानातील साहित्याची तोडफोड केल्याप्रकरणी एकाविरोधात सातारा तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, नामदेव नानू राठोड (रा.म्हसवे ता.सातारा) असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी रामदास रेबु राठोड (वय ५५, रा. म्हसवे) यांनी सातारा तालुका पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. दुकानातील साहित्याची तोडफोड झाल्याने १००० रुपयांचे नुकसान झाले असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

## एमआयडीसी परिसरातून दुचाकीची चोरी

सातारा : एमआयडीसी परिसरातून अज्ञात चोरट्याने दुचाकीची चोरी केल्याची फिर्याद सातारा शहर पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, सातारा एमआयडीसी परिसरातून अज्ञात चोरट्याने एमएच ११ बीवाय ७४७२ या क्रमांकाची दुचाकी चोरुन नेली. याप्रकरणी संजय लक्ष्मण गोसावी (वय ५४, रा. एमआयडीसी, सातारा) यांनी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. ही घटना दि. ८ ऑगस्ट रोजी घडली आहे.

## अपघात प्रकरणी एकावर गुन्हा

सातारा : अपघात करुन एका महिलेस जखमी केल्याप्रकरणी एकाविरोधात शाहूपुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, शाहूपुरी चौकात अपघात झाल्याप्रकरणी शोएब तांबोळी (रा. मंगळवार पेठ, सातारा) याच्या विरुध्द शाहूपुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. दि. २४ जुलै रोजी अपघात झाला असून अपघात प्रकरणी महिलेने पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. दोन दुचाकींचा अपघात होवून तक्रारदार महिलेला दुखापत झाली व दुचाकीचे नुकसान झाले असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

## अल्पवयीन मुलीचे अपहरण

**सातारा :** सातारा शहर परिसरातून अल्पवयीन मुलीचे अज्ञाताने अपहरण केल्याची फिर्याद शाहूपुरी पोलिस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, शाहूपुरी पोलिस ठाण्याच्या हद्दीतून अल्पवयीन मुलीचे अज्ञाताने अपहरण केले असल्याची तक्रार शाहूपुरी पोलिस ठाण्यात दाखल झाली आहे. मुलगी १६ वर्षाची असून ही घटना दि. १५ ऑगस्ट रोजी घडली आहे.

# रामगिरी महाराज यांच्या वक्तव्याचे सातार्‍यात तीव्र पडसाद

## मुस्लिम समाज बांधवांची सातारा शहर पोलिस ठाण्यासमोर गर्दी

**सातारा :** रामगिरी महाराज अहमदनगर यांनी नाशिकच्या सिन्नर तालुक्यात एका कार्यक्रमात प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्याविषयी आक्षेपार्ह विधान केले. त्यामुळे मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या. त्या वक्तव्याचे तीव्र पडसाद शुक्रवारी सातार्‍यात उमटले शहरातील मुस्लीम बांधवांनी रात्री उशिरा सातारा शहर पोलीस ठाण्यासमोर गर्दी केली होती शहर पोलिसांनी या प्रकरणी कायदेशीर सल्ला घेऊन योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले .

रामगिरी महाराजांच्या वादग्रस्त वक्तव्याचे नगर औरंगाबाद नंतर सातार्‍यात तीव्र पडसाद उमटले रामगिरी महाराज याच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी सातारा शहरातील मुस्लिम समाज हजारोच्या संख्येने शहर पोलीस ठाण्याजवळ जमा झाला होता. गुन्हा लगेच दाखल करावा यासाठी मुस्लिम समाज ठाम होता. खबरदारीचा उपाय म्हणून शहर पोलिसांचा बंदोबस्त सतर्क करण्यात आला

परंतु तांत्रिक बाबी लक्षात घेऊन उद्या दुपारी १२ वाजेपर्यंत गुन्हा



दाखल केला जाईल असे पोलीस निरीक्षक म्हस्के यांनी सांगितले. त्यांनी जमावास प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले. या प्रकरणी मुस्लीम समाज बांधव शनिवारी पुन्हा पोलीस निरिक्षक राजेंद्र मस्के यांची भेट घेणार आहेत.

# सर्व वैद्यकीय सेवा बंदीचे आवाहन

**कोरेगांव :** ९ ऑगस्ट २०२४ रोजी, आरजी कार मेडिकल कॉलेज, कोलकता येथे एका तरुण पोस्ट-ग्रॅज्युएट चेस्ट मेडिसिनच्या विद्यार्थीनीचा ड्युटीवर असताना क्रूरपणे बलात्कार(गँगरेप) करुन हत्या करण्यात आली. या भीषण घटनेने वैद्यकीय समुदाय आणि देशाला धक्का बसला आहे. याच्या निषेधार्थ निवासी डॉक्टरांनी आधीच संप सुरू केला आहे. आणि इंडियन मेडिकल असोसिएशनने देशभरात आंदोलन आणि निषेध मोर्चे आयोजित केले असल्याचे कोरेगाव इंडियन मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ.सौ. संगीता सावंत, सेक्रेटरी डॉ. शीतल गोसावी व सर्व पदाधिकार्‍यांनी प्रसिद्धीपत्रक प्रसिद्धीसाठी दिले आहे.

या गुन्ह्याच्या तपासात कॉलेज प्रशासन आणि पोलिसांचा प्रतिसाद संशयास्पद होता आणि प्रामाणिकपणे तपास सुरू ठेवण्यास ते अयशस्वी ठरले. आर जी कार महाविद्यालय प्रशासन व पोलिस यांच्या संगनमताने पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न होत असल्याने दिनांक १३ ऑगस्ट २०२४ रोजी, कोलकता उच्च न्यायालयाने राज्य पोलिसांना या प्रकरणाची जबाबदारी केंद्रीय तपास यंत्रणेला हस्तांतरित करण्याचे आदेश दिले.

१५ ऑगस्ट २०२४ रोजी, आरजी कार मेडिकल कॉलेजला मोठ्या जमावाने तोडफोड केली आणि आंदोलन करणार्‍या वैद्यकीय विद्यार्थ्यांवर हल्ला केला. यावेळी जमावाने गुन्हा झालेली जागेचीही तोडफोड करुन पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला. हा घटनाक्रम डॉक्टर, विशेषतः महिलांच्या हिंसेच्या वाढत्या धोक्याचा आणि वैद्यकीय सुविधांमध्ये सुरक्षेच्या आवश्यकतेचा संकेत देतो. या गुन्ह्यातील पीडितांच्या समर्थनार्थ आणि चालू असलेल्या हिंसाचारविरोधात इंडियन मेडिकल असोसिएशन १७ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ६ ते १८ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ६ पर्यंत २४ तासांच्या सेवा बंदीचा आवाहन करतो. अत्यावश्यक व आपात्कालीन सेवा सुरू राहतील. पण नियमित बाह्यरुग्ण तपासणी आणि शस्त्रक्रिया बंद ठेवण्यात येतील. इंडियन मेडिकल असोसिएशन सर्व देशवासीयांना या गुन्ह्यातील पीडित महिला डॉक्टरांच्या कुटुंबियांस न्याय मिळवून देण्यासाठी या संपास समर्थन देण्याची विनंती करते आणि डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी योग्य ती यंत्रणा उभी करुन कायद्या बदल करण्याचा आग्रह केंद्रशासनाकडे करत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

# कोयना प्रकल्पाला १ हजार कोटीची मान्यता

**पाटण :** कोयना जलविद्युत प्रकल्पाचा बहुउद्देशीय प्रकल्प म्हणून ओळखल्या जाणार्‍या आणि गेल्या १० वर्षांपासून सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी रखडलेल्या कोयना जलविद्युत प्रकल्पाला नुकतीच १ हजार ३३६ कोटी रुपयांच्या निधीची मान्यता मिळाली आहे. कोयना धरणाच्या डाव्या तीरावर पायथा वीजगृह उभारण्यात येणार आहे. जलसंपदा विभाग आणि महानिर्मिती कंपनीच्या सकारात्मक भूमिकेमुळे या बहुउद्देशीय प्रकल्पाला संजीवनी मिळाली. जलसंपदा व महानिर्मिती कंपनीमध्ये कोयना डावा तीर धरण पायथा उदंचन जलविद्युत गृह उभारणीसाठी सामंजस्य करार झाला असून या प्रकल्पाच्या उभारणीसाठी तब्बल १ हजार ३३६ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. तसेच ४ वर्षांत हा प्रकल्प पूर्ण करण्याच्या करारावर स्वाक्षर्‍या झाल्या आहेत.

मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात मंगळवारी उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, जलसंपदा विभाग आणि महानिर्मिती कंपनी यांच्यामध्ये हा सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य करारावर महानिर्मिती कंपनीतर्फे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. एन. बलगन यांनी तर जलसंपदा विभागातर्फे कार्यकारी संचालक अतुल कपोले यांनी स्वाक्षरी केल्या. सातारा जिल्ह्यातील कोयना धरण पायथा येथे ४० मेगावॅट क्षमतेच्या दोन उदंचन जलविद्युत संचांची उभारणी करण्यात येणार आहे. या प्रकल्प उभारणीचे प्राथमिक काम जलसंपदा विभागातर्फे करण्यात आले आहे. उर्वरित प्रकल्प उभारणीचे काम महानिर्मिती व जलसंपदा विभागातर्फे संयुक्तरित्या पूर्ण करण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावाचा आणि उर्वरित कामाचा कोयना बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता विश्वनाथ सानप (कोयनानगर) यांनी सातत्याने पाठपुरावा केला असून आगामी ४ वर्षांत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

याप्रसंगी ऊर्जा विभागाच्या अप्पर मुख्य सचिव श्रीमती आभा शुक्ला, महानिर्मितीचे संचालक (प्रकल्प) अभय हरणे, कार्यकारी संचालक पंकज नागदेवते, मुख्य अभियंता (प्रकल्प नियोजन) अतुल सोनजे व वरिष्ठ अधिकारी, जलसंपदा विभागाचे अप्पर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव (लाक्षेवि) डॉ. संजय बेलसरे, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता व सहसचिव प्रसाद नार्वेकर, अधीक्षक अभियंता अरुण नाईक व कार्यकारी अभियंता विश्वनाथ सानप प्रामुख्याने उपस्थित होते.

# निष्पक्ष तपास करून अहवाल द्या

## आमदार गोरे विरुद्धच्या प्रकरणात न्यायालयाचे निर्देश

**मायणी :** संपूर्ण महाराष्ट्रभर गाजत असलेला मायणी मेडिकल कॉलेज कोविड प्रकरणात खटाव माणचे भाजप आमदार जयकुमार गोरे यांचा सहभाग असलेल्या कोरोना उपचार घोटाळाप्रकरणी उच्च न्यायालयाने राज्य सरकारला सोमवारी धारेवर धरले. गोरे यांना वाचवण्यासाठी तक्रारदारालाच आरोपी बनविण्यात येऊन त्याच्या घरावर ईडीला छापा टाकायला लावल्याचा याचिकाकर्त्यांनी आरोप केला त्यावर न्या. रेवती मोहिते-डेरे आणि न्या. पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठाने संताप व्यक्त केला.

भाजप आमदार जयकुमार गोरे, त्यांची पत्नी व इतर साथीदारांनी कोरोना काळात २०० हून अधिक मृत रुग्णांना जिवंत दाखवून सरकारी योजनांमधून कोट्यवधी रुपये लाटले, असा आरोप करत मायणी येथील दीपक देशमुख यांनी अ‍ॅड. वैभव गायकवाड यांच्यामार्फत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

याचिकेवर न्या. रेवती मोहिते-डेरे आणि न्या. पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. मुख्य सरकारी वकील हितेन वेणेगावकर यांनी सातारा(वडूज) पोलिसांची बाजू मांडली वआमदार गोरे यांच्याविरोधात गुन्हा दाखल केल्याची माहिती त्यांनी न्यायालयाला दिली.

याचिकाकर्त्या दिपक देशमुख यांच्यावतीने अ‍ॅड. सतिश मानेशिंदे यांनी पोलिसांच्या कामाच्या कार्यपध्दतीवर आक्षेप घेतला. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर पोलिसांनी गोरे यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला. मात्र हा गुन्हा नोंदवताना दिपक देशमुख यांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करून महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या अधिकार्‍याच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल केला. पोलिसांनी जाणूनबुजून गोरे यांना पाठीशी घालण्यासाठी हा प्रकार केला आहे असा आरोप करताना, पोलीस या प्रकरणात पूर्णपणे पक्षपाती वागत असल्याचा दावा अ‍ॅड. मानेशिंदे यांनी केला.

खंडपीठाने या याचिकेची दखल घेत सदर घोटाळ्याचा तपास करताना पोलीस सूडभावनेने वागत आसल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असल्याचे मत व्यक्त करताना कुणाच्याहि दबावाखाली अथवा कुणाच्याही सांगण्यावरून तपास करू नका, निष्पाप व्यक्तींना बळीचा बकरा बनवू नका, अशाप्रकारे तपास करणार असाल तर आम्ही पोलिसांची गय करणार नाही, अशी तंबी मा न्यायालयाने दिली. तक्रारदार दिपक देशमुख यांचा अतिरिक्त जबाब नोंदवून घेण्याचे निर्देश वडूज पोलिसांना देत घोटाळ्याचां अधिक तपासाचा अहवाल तीन आठवड्यांत सादर करण्याचे आदेश खंडपीठाने पोलिसांना दिले आहेत.

हा काय प्रकार आहे. तपासाची ही पद्धत कोणती. असा प्रकार खपून घेतला जाणार नाही. सूडाने वागाल तर याद राखा, हयगय खपवून घेतली जाणार नाही, असे खडसावत याप्रकारणाचा निष्पक्ष तपास करा, असा आदेश न्यायालयाने राज्य सरकारला दिला.

वडूज पोलिसांचे काम म्हणजे चोर सोडून संन्याशाला फाशी अशीच काहीशी या म्हणीप्रमाणे काम सुरू असलेले दिसत आहे मायणी मेडिकल कॉलेज मधील कोवीड घोटाळा प्रकरणात वडूज पोलीस हे आमदार जयकुमार गोरे यांच्या दबावाखाली काम करत असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे ज्यांनी याचिका केली त्यांच्यावरच गुन्हा दाखल करून त्यांनाच न्यायालयापुढे उभे करण्याचे धाडस फक्त वडूज पोलीसच करू शकतात .खरे तर ज्यांच्यावर गुन्हा दाखल व्हायला पाहिजे त्यांना पाठीशी घालण्याचे काम वडूज पोलीस करीत आहेत यामुळे वडूज पोलिसांच्या कामावर प्रश्नचिन्ह निर्माण होत असून याबाबत परिसरात उलट सुलट चर्चा ऐकायला मिळत आहे.

# 'मविआकडे १०-१२ मुख्यमंत्री पदाची स्वप्न पाहणारे

## शिंदे गटाच्या नेत्याचा उद्धव ठाकरेंना टोला

**सोलापूर :** गेल्या लोकसभा निवडणुकीतील यशानंतर महाविकास आघाडी आता विधानसभा निवडणूक २०२४ साठी मैदानात उतरली आहे. मुंबईत एकत्र जाहीर सभा घेत विधानसभा एकत्रच लढणार असल्याचा निर्धारही आघाडीतील नेत्यांनी केला. महाविकस आघाडीकडून मुख्यमंत्री पदाचा चेहरा कोण? यावरुन विरोधक सातत्याने प्रश्न विचारत आहेत. मुंबईतील मेळाव्यात उद्धव ठाकरे यांनी आपलं मत व्यक्त केलं. यामुळे आघाडीतील राष्ट्रवादी आणि काँग्रेसची चांगलीच कोंडी झालेली पाहायला मिळाली. दरम्यान, यावरुन आता शिंदे गटातील नेत्याने टोला लगावला आहे.

शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे आमदार शहाजी बापू पाटील यांनी यावरुन महाविकास आघाडीला चिमटा काढला आहे. महाविकास आघाडीकडे १०-१२ मुख्यमंत्रीपदाची स्वप्न बघणारे नेते असल्याचा टोला 'काय झाडी, काय डोंगर..' फेम शहाजीबापूंनी उद्धव ठाकरेंना लगावलाय. उद्धव ठाकरे यांनी यंदा निवडणूक लढवत नसल्याचे सांगितल्यानंतर आता काँग्रेस राष्ट्रवादी काय करते हेही पहायला मिळेल असेंही शिंदे गटाचे शहाजी पाटील म्हणालेत. पंढरपूर येथे दिवंगत नेते सुधाकरपंत परिचारक यांच्या चौथ्या पुण्यस्मरणानिमित्त ते आज आदरांजली वाहायला आले होते. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री पदाबाबत उद्धव ठाकरे यांच्या भूमिकेवर शहाजी बापू पाटील यांनी प्रतिक्रिया दिली.

ठाकरेंच्या वक्तव्याने मित्रपक्षांची कोंडी?

पृथ्वीराज चव्हाण, शरद पवार तुम्ही मुख्यमंत्री पदाचा चेहरा जाहीर करा मी पाठींबा देतो, असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी मविआ म्हणून एकत्र निवडणुकीला सामोरं जाण्याचा एकप्रकारे निर्धार केलाय. सोबतच या चर्चांना अंशतः पूर्णविराम मिळाला आहे. तर त्यानंतर आता काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सुद्धा मुख्यमंत्रीपदावरून एका वाक्यात प्रतिक्रिया दिली आहे.

उद्धव ठाकरे यांनी पहिलं भाषण करून महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण यावर महत्वाचे भाष्य केलंय. यावर बोलताना नाना पटोले म्हणाले की, उद्धव ठाकरे यांनी मुद्दामून हा प्रश्न टाकलाय. त्यांच्या माध्यमातून आता हा विषय चर्चेत राहील, पण मुख्यमंत्री चेहरा कोण असेल हे जेष्ठ नेते मिळून ठरवतील आणि अंतिम निर्णय घेतील. असे म्हणत नाना पटोलेंनी यावर पडदा टाकला.

# राज्यातील तणावपूर्ण स्थितीवर शरद पवारांचे महत्त्वाचे भाष्य

**मुंबई :** बांगलादेशमध्ये सत्तांतर झाल्यानंतर तेथील हिंदू अल्पसंख्याकांवर अत्याचार होत असल्याच्या बातम्या पुढे येत आहेत. त्यावर आता देशात ठिकठिकाणी प्रतिक्रिया उमटत आहेत. महाराष्ट्रातही काही ठिकाणी त्याचे पडसाद पाहायला मिळाले. यानंतर राज्यात काल तणावपूर्ण परिस्थिती दिसली. यावर आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. त्यांनी जनतेला शांततेचे आवाहन केले असून बांगलादेशमध्ये घडणाऱ्या गोष्टींचा राज्यावर परिणाम होऊ देऊ नका, असे सांगितले आहे.

काय म्हणाले शरद पवार?

''बांगलादेशमध्ये सत्तांतर झाले. यासाठी तरुण पिढीने उठाव केला होता. त्यातून काही गोष्टी घडल्या. पण दुर्दैवाने त्याची प्रतिक्रिया भारतात काही ठिकाणी उमटली. प्रामुख्याने बांगलादेशच्या सीमेवरील पश्चिम बंगाल आणि इतर राज्यात परिस्थिती अधिक गंभीर होती. पण तिथे काही घडले त्याचे परिणाम महाराष्ट्रात उमटतील, असे कधी वाटले नव्हते. याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. पण आज समाजातील सर्व घटकांमध्ये एकवाक्यता आणि सामंजस्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रात जे काही घडले, ते राज्याच्या हिताचे नाही. राज्यात शांतता प्रस्थापित करायची असेल तर समाजकारण आणि राजकारणातील व्यक्तींनी सयंमाचा पुरस्कार करावा आणि शांतता कशी राहिल, याबद्दलची खबरदारी घ्यावी, एवढेच मी सांगू इच्छितो'', असे पवार म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, ''शासनाचे धोरण, शासनाची कारवाई, गृहखात्याची जबाबदारी यावर भाष्य करता येईल. मात्र आज मला शांतता आणि सौहार्द याचे जास्त महत्त्व वाटते. म्हणून मी अन्य बाबींवर भाष्य करू इच्छित नाही. शांतता कशी प्रस्थापित होईल, याबाबत मी अधिक आग्रही आहे. अन्य काही देशात घडणाऱ्या गोष्टींसाठी आपल्या राज्यातील लोकांचे जीवन संकटात येईल, असे काही करू नये हे माझे आवाहन आहे.''

# अजितदादांविरोधात बारामतीतून निवडणूक लढवणार का?



**युगेंद्र पवारांची पहिली प्रतिक्रिया समोर**

**पुणे :** लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रात महायुतीला मोठा फटका बसला तर दुसरीकडे महाविकास आघाडीने मात्र जोरदार मुसंडी मारली. महायुतीमधील अनेक दिग्गज उमेदवारांचा पराभव झाला. बारामती लोकसभा निवडणूक सर्वाधिक चर्चेत राहिली. या मतदारसंघातून सुनेत्रा पवार यांचा पराभव झाला तर मविआच्या उमेदवार सुप्रिया सुळे विजयी झाल्या. त्यानंतर आता पुन्हा एकदा विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बारामती मतदारसंघ चर्चेत आला आहे. या मतदारसंघातून राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून युगेंद्र पवार यांना उमेदवारी मिळू शकते अशी चर्चा आहे. त्यामुळे आता युगेंद्र पवार निवडणुकीच्या रिंगणात उतरणार का याबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे, यावर आता युगेंद्र पवार यांनी स्वतः प्रतिक्रिया दिली आहे.

**नेमकं काय म्हणाले युगेंद्र पवार?**

बारामती विधानसभा निवडणुकीत उमेदवार म्हणून युगेंद्र पवार यांच्या नावाची चर्चा सुरू आहे, यावर बोलताना ते म्हणाले की, या मतदारसंघात उमेदवार कोण असणार याबाबत शरद पवार, जयंत पाटील, सुप्रिया सुळे आणि पक्षातील वरिष्ठ नेते निर्णय घेतील. मात्र मी या मतदारसंघात अनेक दिवसांपासून सामाजिक कार्य करत आहे, इथल्या ज्या संस्था आहेत त्याच्यामध्ये लक्ष घालत आहे. साहेबांसाठी लोकसभेला मी इथे प्रचार केला, एवढंच आहे. अशी प्रतिक्रिया युगेंद्र **पवार यांनी दिली आहे.**

**पार्थ पवारांना संधी?**

दरम्यान दुसरीकडे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या एका वक्तव्यामुळे चर्चेला उधाण आले आहे. मी सात ते आठ वेळा निवडणूक लढवली आहे, त्यामुळे मला रस नाही. जर जनता आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी सांगितले तर पार्थ पवार यांचा विचार केला जाईल असं अजित पवार यांनी म्हटले आहे. त्यामुळे आता या मतदारसंघातून अजित पवार निवडणूक लढवणार की पार्थ पवार हे पाहाणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# विधानसभेच्या तोंडावर पवारांचा अजितदादांना पुन्हा धक्का! या जिल्ह्यात पाडले खिंडार

**जळगाव :** विधानसभा निवडणुका तोंडावर आल्या असून सर्वच राजकीय पक्ष आता ताकदीने मैदानात उतरले आहेत. लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या घवघवित यशानंतर महाविकास आघाडी फॉर्मात दिसत आहे. यातही शरद पवार गटाचा स्ट्राईक रेट हा राज्यात सर्वाधिक होता. याचाच परिणाम म्हणजे आता हळहळू नेत्यांची पवार गटात घरवापसी होऊ लागली आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या युवक कार्यकारिणीतील युवक विधानसभा क्षेत्र प्रमुखांसह तब्बल २० जणांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटात प्रवेश केला.

अजितदादांना धक्का

जळगावच्या महिला मेळाव्यात खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते अजित पवार गटातील युवक कार्यकारिणीतील २० जणांनी शरद पवार गटात प्रवेश केला. मंत्री अनिल पाटील वेळ देत नसल्याने तसेच कार्यकर्त्यांची कुठलीही कामे नसल्याने नाराजी होती. त्यामुळे शरद पवार गटात प्रवेश केल्याचे युवक पदाधिकाऱ्यांनी सांगितले. अजित पवार गटाचे युवक कार्याध्यक्ष साहील पटेल, युवक शहर जिल्हाध्यक्ष सुशील शिंदे, विधानसभा क्षेत्र प्रमुख युवक रफिक पटेल, युवक उपाध्यक्ष अमर येवले यांच्यासह २० जणांनी अजितदादांना सोडचिठ्ठी देत शरद पवार गटात जाहीर प्रवेश केला.

अजित पवार सत्तेत सहभागी झाल्यानंतर युवक पदाधिकाऱ्यांनी शरद पवार यांना सोडून अजित पवार गटात प्रवेश केला होता. अजित पवार गटात गेलेले सर्व युवक पदाधिकारी ९ महिन्यानंतर पुन्हा शरद पवार गटात परतले आहेत. एक निष्ठावंत राहून सुद्धा कुठल्याही पदाधिकारी व कार्यकत्याच्या समस्या आपल्या पक्षाचे मंत्रीअनिल भाईदास पाटील यांनी सोडविल्या नाही. याच कारणामुळे अजित पवार गटातील पदाचा राजीनामा देऊन शरद पवार गटात प्रवेश केला असल्याचे युवक पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# कोलकाता घटनेच्या निषेधार्थ ५०० डॉक्टर्स रस्त्यावर; मूकमोर्चा काढून बंद पाळला




**नाशिक :** कोलकाता येथील कोलकाता येथे पोस्ट-ग्रॅज्युएट चेस्ट मेडिसिनच्या विद्यार्थिनीची ड्युटीवर असताना बलात्कार करून हत्या करण्यात आली. या गुन्ह्यातील पीडितांच्या समर्थनार्थ आणि चालू असलेल्या हिंसाचार विरोधात इंडियन मेडिकल असोसिएशनच्या वतीने डॉक्टरांनी मूकमोर्चा काढून बंद पाळला.

अत्यावश्यक सुविधा मात्र देण्यात आली.९ ऑगस्ट २०२४ रोजी आरजी कार मेडिकल कॉलेज, कोलकाता येथे एका तरुण पोस्ट-ग्रॅज्युएट चेस्ट मेडिसिनच्या विद्यार्थिनीची ड्यूटीवर असताना बलात्कार करून हत्या करण्यात आली. या भीषण घटनेने वैद्यकीय समुदाय आणि देशाला धक्का बसला आहे. याच्या निषेधार्थ निवासी डॉक्टरांनी आधीच संप सुरू केला आहे. इंडियन मेडिकल असोसिएशनने देशभरात आंदोलन आणि निषेध मोर्चे आयोजित केले होते. नाशिकच्या इंडियन मेडिकल असोसिएशनच्यावतीने आयएमए हाऊस ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत मूकमोर्चा काढण्यात आला. या मोर्चात ५०० हून अधिक डॉक्टर्स तसेच नाशिकरोड आयएमए, एफपीए, निमा, आयडीए, होमिओपॅथी डॉक्टर्स, न्यू निमा अशा अनेक वैद्यकीय संघटना सहभागी झाल्या होत्या.मोर्चाचे रूपांतर हुतात्मा स्मारक येथील सभेत झाले.

आयएमचे अध्यक्ष डॉ. सुधीर संकलेचा यांनी सभेला संबोधित केले. त्यानंतर प्रतिनिधिक स्वरूपात जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना निवेदन दिले. मोर्चाच्या यशस्वीतेसाठी डॉ. रविराज खैरनार, डॉ. नीलेश निकम, डॉ. अनिरूद्ध भांडारकर, डॉ. राजेंद्र नेहते, डॉ. नहाटा, डॉ. सारंग दराडे, डॉ. रमेश घाडगे आदिंनी परिश्रम घेतले. या गुन्ह्यातील पीडितांच्या समर्थनार्थ आणि चालू असलेल्या हिंसाचार विरोधात इंडियन मेडिकल असोसिएशनने बाह्य रुग्ण सेवा बंद ठेवल्या आहेत. अत्यावश्यक व आपत्कालीन सेवा सुरू राहतील. पण नियमित बाह्यरुग्ण तपासणी आणि शस्त्रक्रिया बंद ठेवण्यात येतील. कृपया सर्व रुग्णांनी ह्याची नोंद घ्यावी आणि सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

# पुणतांबा स्टेशनवर ग्रामस्थांचे रेल रोको आंदोलन

## सर्व रेल्वे थांबविण्याची मागणी

**कोपरगाव (जि.अहमदनगर) :** सर्व प्रवासी गाड्यांना पुणतांबा रेल्वे स्टेशनवर थांबा मिळावा, आरक्षण खिडकी, तिकीट खिडकी सुरू करावी आदी मागण्यांसाठी ग्रामस्थांनी स्वातंत्र्य दिनी रेलरोको आंदोलन केले. या आंदोलनामुळे कोपरगाव, कान्हेगाव, श्रीरामपूर येथे रेल्वे थांबविण्यात आल्या. त्यामुळे प्रवाशांचे हाल झाले.कोपरगाव पासून जवळच असलेल्या पुणतांबा रेल्वे स्टेशनवर ग्रामस्थांनी गुरूवारी सकाळी दहा वाजता रेल्वे रोको आंदोलन केले. सर्व प्रवासी गाड्यांना पुणतांबा रेल्वे स्टेशनवर थांबा मिळावा, आरक्षण खिडकी, तिकीट खिडकी सुरू करावी, रेल्वे प्रशासन कर्मचारी अरेरावी करतात त्यांना चाप बसावा, तसेच कोविड नंतर ज्या रेल्वे बंद केल्या त्या सुरू कराव्यात या प्रमुख मागण्या ग्रामस्थांच्या आहे.

पुणतांबा येथे सकाळी दहा वाजता हे आंदोलन सुरू झाले. यात पुणतांबा ग्रामस्थ बरोबर पंचक्रोशीतील नागरिक, विद्यार्थी, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. रेल्वे रुळावर सर्वांनी बैठक मारली. या रेल रोको आंदोलनात बंदोबस्तासाठी रेल्वे पोलीस फोर्स तसेच महाराष्ट्र पोलीस असे मिळून एकूण शंभर कर्मचारी तैणात होते. उपविभागीय पोलिस अधिकारी शिरीष वमने परिस्थिती वर लक्ष ठेऊन आहेत. दुपारी बारावाजेपर्यंत हे आंदोलन सुरूच होते.

वंदे भारत रेल्वे एक तास पासून मागच्या कोन्हेगाव स्टेशन वर उभी असल्याची आहे.

# नितेश राणेंच्या जन आक्रोश मोर्चाला इंदापुरात विरोध

**इंदापूर :** शहरातील विरश्री मालोजीराजे भोसले गढी भोवती असणारे अतिक्रमण काढावे या मागणीसाठी आमदार नितेश राणे यांच्या नेतृत्वाखाली आज इंदापूर येथे हिंदू जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. नितेश राणे इंदापूरमध्ये लोकशाही मार्गाने आंदोलन करणार आहेत. नितेश राणेंच्या समर्थकांनी यासंदर्भात दावा केला आहे.

परंतु, काही जातीवादी संघटनेची लोकं इंदापूर मध्ये येऊन इंदापूर मध्ये असणारा जातीय सलोखा बिघडवून त्यांच्यामध्ये विष कालवण्याचा प्रयत्न करतील. त्यामुळे या मोर्चास परवानगी नाकारावी अशी मागणी सकल मराठा समाजाने पोलीस प्रशासनाकडे केली होती. परंतु, पोलीस प्रशासनाने सदरील मोर्चास परवानगी दिली आहे. मोर्चा रामवेस नाका येथून निघणार आहे. इंदापूर नगरपरिषद मैदानात सभा होणार आहे.

तसेच नितेश राणे यांच्याकडून जरांगे पाटलांविरोधात जी भूमिका घेतली जात आहे त्याला विरोध म्हणून नितेश राणे यांनी इंदापूर मध्ये येऊ नये, आम्ही त्यांना इंदापूरमध्ये येऊ देणार नाही. जर ते इंदापूर मध्ये आले तर त्यांची सभा आम्ही उधळून लावू असा इशारा नितेश राणे यांना सकल मराठा समाजाकडून देण्यात आलेला आहे. त्यामुळे इंदापूरमध्ये वातावरण तापले जाणार आहे.

या कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या मोर्चाच्या अनुषंगाने पोलिसांकडून संपूर्ण शहरात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला असून, पोलिसांकडून कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून शहरात पथ संचलन करण्यात आले.

# रहिमतपूर येथील 'अण्णा देशपांडे पुरस्कार' पत्रकार विजय मांडके यांना प्रदान

**कोरेगाव :** आयुष्यभर जपलेली मूल्ये ते पु .न .तथा अण्णा देशपांडे त्यांच्या नावे दिला जाणारा पुरस्कार जेष्ठ पत्रकार विजय मांडके यांना देण्यात आला हा पुरस्कार योग्य व्यक्तीची निवड करण्यात आली ही बाब कौतुकास्पद आहे.सातारा जिल्ह्याचे उत्कृष्ट जेष्ठ पत्रकार विजय मांडके यांना मिळालेला सन्मान आहे .ही त्यांनी गेली चाळीस वर्षे पत्रकारितेत केलेल्या कामाची पोचपावती आहे असे प्रतिपादन जेष्ठ विचारवंत किशोरजी बेडकिहाळ यांनी केले. हिंद नगरवाचनालय व ग्रंथालय रहिमतपूर येथे डॉ.आण्णा देशपांडे समता प्रतिष्ठानतर्फे आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुनिल माने (भैय्यासाहेब) होते.माजी



लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंदा कोरे, अॅड.विकास देशपांडे, पतअविनाश माने संचालक सह्याद्री सहकारी साखर कारखाना लि यशवंतनगर,यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना किशोर बेडकिहाळ पुढे म्हणाले की,आयुष्यभर जपलेली मूल्ये ही फार महत्त्वाची असतात.विजय मांडके यांनी निर्भयपणे पत्रकारिता केली, प्रामाणिकपणा,आई वडील यांचे आचार विचार आत्मसात करून ते पुढे मार्गक्रमण करत होते. जे काही करायचे ते निर्भयपणे जिथे जिथे अन्याय होईल तिथे तिथे विजय मांडके पोचतात, गोरगरीब पिचलेल्या माणसांचे प्रश्न, अन्याय ज्याच्यावर होत असतात.तिथे विजय मांडके पोचणारी अशी ही धडपड त्यांनी गेली चाळीस वर्षे करत आहेत.तृयांचा ईतका बारीक अभ्यास आहे त्याआधारे त्यांनी जर ठरवले तर एक पुस्तक होईल.एवढ लिखाण होईल. केवळ पत्रकारिता नाही तर एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून ज्यांनी काम केले ते विजय मांडके पत्रकारितेमध्ये निर्भयता असणे गरजेचे आहे. सकारात्मकता,वास्तवता,असणे आवश्यक आहे . पत्रकारितेमध्ये दोन प्रकार आहेत औपचारिक व अनौपचारिक पत्रकारिता, सत्यशोधक पत्रकारिता त्यांच्यासाठी राबणारी एवढी यंत्रणा सगळ्यांच्या वाचा फोडण्यात यश मिळवितात विजय मांडके यांच्याकडे निर्भयता हा मोठा रोल आहे,परखड वाचक असून त्यांची वाणी बोलतेय,खरीखूरी पत्रकारिता समाजसेवा, लोकांच्या प्रश्नांना वाचा फोडणारी विजय मांडके यांनी केली.सुरूवातीच्या काळात बाळशास्त्री जांभेकर,प्र.के





**स्वातंत्र्यदिनी सातारकरांनी केली कित्येक टन जिलबी फस्त ..**

**दरवर्षी स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिनी सातारा जिल्ह्यामध्ये तोंड गोड करण्याची परंपरा गेली ७५ वर्षे सुरू आहे. दरवर्षी सातारा जिल्ह्यातील विविध गावात तसेच शहरांमध्ये जिलेबीचे मोठे स्टॉल लावून शेकडो टन जिलेबी फस्त करण्याचा उपक्रम याही वर्षी नागरिकांनी साजरा केला. तुपातील, तेलातील, रिफाइंड तेलातील तसेच दुधातील ,गुळाची अशा अनेक प्रकारच्या चवीची ही जिलेबी सातारकर फरसाण तसेच टेस्टी चिवड्या सोबत फस्त करतात .अशाच लागलेल्या स्टॉलचे आणि त्यावर झालेल्या गर्दीची ही दृश्य/**